# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन




श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करताना शिवाजीराव पाटील व डॉ. विजयकुमार पाटील समवेत डॉ. बी. एन. रावण, डॉ. एस. एस .कुरलीकर, प्रा. जगदिश सरदेसाई, प्रा. पी. डी. माने, डॉ. एन. डी. मांगोरे, प्रा. ए. आर. महाजन व मान्यवर

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी समता,बंधुता आणि मानवता यांची शिकवण समाजाला दिली. शिक्षण प्रसार,अस्पृश्यता निवारण,स्त्री शिक्षण, शेती, सहकार, उद्योगधंदे, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा अनेक बाबतीत त्यांचे योगदान खूप मोठे आहे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे विचार आजच्या काळातही मार्गदर्शक आहेत असे प्रतिपादन इतिहास विभागातील प्रा. पी. डी. माने यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व मानसशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त आयोजित केलेल्या प्रतिमा पूजन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. पी. डी. माने बोलत होते.

यावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन संस्था सचिव शिवाजीराव पाटील व प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रो.डॉ.बी.एन. रावण,ॲक्टिव्हिटी प्रमुख डॉ. एस. एस. कुरलीकर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. जगदिश सरदेसाई यांनी केले आभार डॉ. एन. डी. मांगोरे यांनी मानले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक,कर्मचारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते.